MHYA170011172022

खटला दाखल तारीख :– १५/१०/२०२२
पंजीकृत तारीख :– १५/१०/२०२२
निकालाची तारीख :– ०१/०३/२०२४
कालावधी ०१ वर्षे, ०४ महिने, १५ दिवस

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कळंब यांचे न्यायालयात**
**(पिठासीन अधिकारी : अभय म. विभुते यांचे समक्ष)**

**नियमीत फौजदारी खटला क्र. ९९/२०२२** **नि.क्र.४३.**

महाराष्ट्र शासन
मार्फत पोलीस निरीक्षक,
पोलीस ठाणे, कळंब,
तहसिल–कळंब, जिल्हा–यवतमाळ. **...अभियोगपक्ष.**

**–विरुध्द–**

०१. किशोर चिंधुजी भोयर,
वय– ३६ वर्षे, धंदा –मजुरी,
०२. नरेश लक्ष्मण सोळंकी,
वय– ५० वर्षे, धंदा –मजुरी,
०३. शंकर नागोराव चौधरी,
वय– ४२ वर्षे, धंदा –मजूरी,
सर्व राहणार– सावरगांव, ता. कळंब,
जि. यवतमाळ ...**आरोपी.**

---

**आरोप – भारतीय दंड संहिताचे कलम ३२४, ३२३, ५०४ आणि ५०६ सह कलम ३४ अन्वये**

---

अभियोगपक्षातर्फे सहा सरकारी अभियोक्ता :– विधीज्ञ आर.आर. त्रीवेदी,
आरोपीतर्फे विद्वान विधीज्ञ :– विधीज्ञ व्ही.व्ही.मोहनापुरे.

---

**न्या य नि र्ण य**

**(अधिघोषित दिनांक ०१/०३/२०२४)**

आरोपींविरुध्द भारतीय दंड संहितेचे कलम ३२४, ३२३, ५०४ व ५०६ सह कलम ३४ अन्वये खटला दाखल करण्यात आला आहे.

**अभियोगपक्षाच्या खटल्याची हकीकत खालीलप्रमाणे आहे** :–

०२. फिर्यादी हे मौजे सावरगांव येथील रहिवासी आहेत. दिनांक २६/०८/२०२२ रोजी रात्री आठ वाजता फिर्यादी हे त्यांच्या घरासमोर उभे होते. त्यावेळी आरोपी किशोर यांनी त्यांना शिवीगाळ का करता अशी विचारणा केली. त्यावेळी फिर्यादी यांनी शिवीगाळ करत नाही असे आरोपी किशोर यास समजावून सांगितले. त्यावेळी आरोपी नरेश व शंकर हे तेथे आले व त्यांनी आरोपी किशोर यांच्या सांगण्यावरुन कु–हाडीच्या दांडयाने फिर्यादीच्या उजव्या पायाच्या टोंगळयाखाली, उजव्या गालावर व डोक्यात मारुन दुखापत केली. त्यावेळी फिर्यादी यांचा मुलगा साक्षीदार सुमीत हा भांडण सोडवण्याकरीता मधात गेला असता आरोपी शंकर याने त्यास थापडाबुक्यांनी मारहाण करुन जीवे मारण्याची धमकी दिली. सबब फिर्यादी यांनी प्रस्तुत घटनेची फिर्याद पोलीस ठाणे, कळंब येथे नोंदवली.

०३. सदरील फिर्याद वरुन पोलीस ठाणे, कळंब, जि. यवतमाळ येथे गु.र.क्रं. ६८७/२०२२, कलम ३२४, ३२३, ५०४ व ५०६ सह कलम ३४ भा.दं.वी अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. तपासीक अंमलदार यांनी तपासाअंती दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले.

०४. मी आरोपींविरुध्द भारतीय दंड संहितेच्या कलम ३२४, ३२३, ५०४ व ५०६ सह कलम ३४ अन्वये (नि.क्रं.३१) वर दोषारोप निश्चित करण्यात आले. आरोपींवर लावण्यात आलेले आरोप त्यांनी नाकारले व संपरीक्षेला सामोरे जाण्याची तयारी दर्शविली. आरोपींविरुध्द कोणताही आक्षेपजनक पुरावा मिळून आला नाही. त्यामूळे नि.क्रं. ०१ वरील सविस्तर आदेशान्वये आरापीचे फौजदारी प्रक्रीया संहितेचे कलम ३१३ (१)(ब) अन्वये निवेदन नोंदवण्यात आले नाही.

०५. अभियोगपक्षाचे खटल्याचे कथन विचारात घेता, खालील मुद्दे माझे विचारार्थ आले. त्यावर मी खालीलप्रमाणे कारण–मिमांसेनुसार निष्कर्ष नोंदविले आहेत.

| <u>मुद्दे</u> | <u>निष्कर्ष</u> |
|---|---|
| १) दिनांक २६/०८/२०२२ रोजी रात्री ०८.०० वाजता मौजे सावरगांव, ता. कळंब येथे आरोपींनी आपसात संगनमत करुन आरोपी नरेश याने फिर्यादीस कु–हाडीच्या दांडयाने उजव्या पायाच्या टोंगळयाखाली, गालावर व डोक्यात मारुन ईच्छापुर्वक दुखापत करुन भा.द.वि.चे कलम ३२४ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला, ही बाब अभियोगपक्षाने सिध्द् केली काय ? | ...नकारार्थी. |
| २) वर नमुद दिवशी, ठिकाणी व वेळी आरोपींनी आपसात संगनमत करुन आरोपी नामे शंकर याने साक्षीदार सुमीत यास थापडा बुक्यांनी मारहाण करुन भा.द.वि.चे कलम ३२३ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला, ही बाब अभियोगपक्षाने सिध्द् केली काय ? | ...नकारार्थी. |
| ३) वर नमुद दिवशी, ठिकाणी व वेळी आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादी व साक्षीदार यांना शिवीगाळ करुन शांतता भंग केली व भा.द.वि.चे कलम ५०४ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला ही बाब अभियोगपक्षाने सिध्द् केली काय ? | ...नकारार्थी. |

| | |
|---|---|
| ४) वर नमुद दिवशी, ठिकाणी व वेळी आरोपीने फिर्यादी व साक्षीदार यांना फौजदारी पात्र धाकटदपटशा करुन जीवे मारण्याची धमकी देवून भा.द.वि. चे कलम ५०६ अन्वये गुन्हा केला, ही बाब अभियोगपक्षाने सिध्द् केली काय ? | ...नकारार्थी. |
| ५) आदेश काय ? | ...आरोपींची निर्दोष मुक्ताता करण्यात आली. |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>मुद्दा क्र.०१ ते ०४ करीता</u> :–**

०६. अभियोगपक्षाने आरोपींवर ठेवण्यात आलेले दोषारोप सिध्द करण्यासाठी फिर्यादी तथा साक्षीदार क्रं.०१ नामे विनोद (नि.क्रं.३६) वर तपासलेले आहे. फिर्यादी व आरोपी यांच्यामध्ये न्यायालयाबाहेर तडजोड झाली असल्याकारणाने फिर्यादीने अभियोगपक्षास पुरक अशी साक्ष दिलेली नाही. प्रस्तुत गुन्हा हा तडजोडपात्र नसल्यामुळे फिर्यादीने दाखल केलेल्या (नि.क्रं.३५) वरील अर्जावर प्रकरण तडजोडी काढण्याचे परवानगी नाकारण्यात आलेली आहे. फिर्यादी तथा सा.क्र.०१ नामे विनोद यांनी त्यांच्या साक्ष पुराव्यात स्पष्ट नमुद केले आहे की, त्यांची आरोपींसोबत न्यायालयाबाहेर तडजोड झालेली आहे.

०७. फिर्यादी तथा सा.क्रं.०१ नामे विनोद यांनी त्यांच्या साक्ष पुराव्यामध्ये कथन केले की, घटना अंदाजे ०३ वर्षापुर्वी मौजे सावरगांव येथे घडली. सदर दिवशी त्यांची आरोपींसोबत किरकोळ कारणावरुन वादावादी झाली होती. याव्यतिरीक्त काहीही झाले नाही. फिर्यादी तथा सा.क्रं.०१ नामे विनोद यांनी त्यांच्या साक्षपुराव्यामध्ये फिर्याद मधील संपूर्ण मजकूर नाकारलेला आहे. सबब, फिर्याद सिध्द झालेली नाही. फिर्यादी तथा सा.क्रं.०१ नामे विनोद यांनी त्यांच्या पुराव्यात घटनेच्या दिवशी आरोपींनी आपसात संगनमत करुन त्यांना आरोपी नरेश याने

कु–हाडीच्या दांडयाने पायावर, गालावर व डोक्यात तसेच, साक्षीदार सुमीत यास आरोपी शंकर याने थापडाबुक्यांनी मारहाण व शिवीगाळ करुन जीवे मारण्याची धमकी दिल्याची स्पष्टपणे नाकारलेले आहे. फिर्यादी तथा सा.क्रं.०१ नामे विनोद यांनी अभियोगपक्षाच्या खटल्याप्रमाणे कथन न केल्याने सहा. सरकारी अभियोक्ता यांनी त्यांना उत्तर सुचक प्रश्न विचारले असता त्यास त्यांनी नकारार्थी उत्तरे दिलेली आहेत. आरोपींविरुध्द कोणताही पुरावा मिळून आलेला नाही. सहा.सरकारी अभियोक्ता यांनी फिर्यादी तथा सा.क्रं.०१ नामे विनोद यास उत्तर सुचक प्रश्न विचारुन देखील अभियोगपक्षास सहाय्य होईल असे काहीही निष्पन्न झालेले नाही.

०८. अभियोगपक्षातर्फे सा.क्रं.०२ नामे सुमीत यांची साक्ष (नि.क्रं.३९) अन्वये नोंदवण्यात आलेली आहे. त्यांनी त्यांच्या साक्षपुराव्यामध्ये घटनेच्यादिवशी आरोपी नरेश याने फिर्यादीस कु–हाडीच्या दांडयाने पायावर व डोक्यात व त्यांना आरोपी शंकर यांनी थापडाबुक्यांनी मारहाण केल्याचे स्पष्टपणे नाकारलेले आहे.

०९. प्रस्तुत प्रकरणात आरोपीपक्षातर्फे अभिलेखावर दाखल फिर्यादी तथा सा.क्रं.०१ नामे विनोद व सा.क्रं.०२ नामे सुमीत यांचे वैदयकिय प्रमाणपत्र (नि.क्रं.४० व ४१) मान्य करण्यात आलेले आहे. तसेच, घटनास्थळ पंचनामा (नि.क्रं.४२) मान्य करण्यात आलेले आहेत. परंतु, फिर्यादी तथा सा.क्रं.०१ नामे विनोद व सा.क्रं.०२ नामे सुमीत यांनी त्यांच्या पुराव्यामध्ये त्यांना आरोपींनी आपसात संगनमत करुन त्यांना कु–हाडीच्या दांडयाने हातावर मारुन ईच्छापुर्वक दुखापत केल्याचे व थापडाबुक्यांनी मारहाण केल्याची बाब स्पष्टपणे नाकारलेली आहे. सबब, वैदयकिय प्रमाणपत्र (नि.क्रं.४० व ४१) अभियोगपक्षास पुरक ठरत नाही.

१०. प्रस्तुत प्रकरणात अभियोगपक्षास आरोपींविरुध्द ठेवण्यात आलेला दोषारोप निःसंदिगधपणे सिध्द् करण्यास अपयश आल्याचे स्पष्ट होते.

आरोपींविरुध्द कोणताही पुरावा मिळून आलेला नाही. फिर्यादी तथा सा.क्रं.०१ नामे विनोद यांनी त्यांच्या साक्षपुराव्यामध्ये घटना घडल्याचे स्पष्टपणे अमान्य केलेले आहे. तसेच, फिर्यादी तथा सा.क्रं.०१ नामे विनोद यांनी त्यांच्या पुराव्यात घटनेच्या दिवशी आरोपी नरेश याने कु–हाडीच्या दांडयाने पायावर, गालावर व डोक्यात तसेच, साक्षीदार सुमीत यास आरोपी शंकर याने थापडाबुक्यांनी मारहाण व शिवीगाळ करुन जीवे मारण्याची धमकी दिल्याचे स्पष्टपणे नाकारलेले आहे. त्यामुळे आरोपींवरील दोषारोप अभियोगपक्षाने सिध्द् केलेले नाही. म्हणून मी मुद्दा क्रमांक ०१ ते ०४ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहेत.

**<u>मुद्दा क्रं.०५ करीता</u> :–**

११. वर चर्चिलेनुसार फिर्यादी व आरोपी यांच्यात न्यायालयाबाहेर तडजोड झालेली आहे. आरोपींविरुध्द उक्त दोषारोप सिध्द करण्याकरीता कोणताही सबळ पुरावा अभियोगपक्षातर्फे पटलावर आलेला नाही. त्यामुळे आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. तसेच, फौजदारी प्रक्रिया संहिता चे कलम ४३७(अ) अन्वये सदर न्यायनिर्णयाविरुध्द अपील याचीका दाखल करण्यास आरोपींनी सदर अपील याचीकेच्या सुनावणी दरम्यान माननीय नामदार अपील न्यायालयासमक्ष हजर राहण्याकरीता उक्त कलमान्वये प्रत्येकी रुपये पंधरा हजाराचे वैयक्तीक जात मूचलका दाखल करणे आवश्यक आहे. तसेच, प्रस्तुत प्रकरणातील जप्त मुद्देमाल एक कु–हाडीचा दांडा ही मुल्यहिन असल्याने अपील कालावधीनंतर नियमाप्रमाणे नष्ट करणे क्रमप्राप्त आहे. म्हणून मी मुद्दा क्रं.०५ च्या उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**–: <u>आ दे श</u> :–**

(१) आरोपींची फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २४८(१) अन्वये कलम ३२४, ३२३, ५०४ व ५०६ सह कलम ३४ भारतीय दंड संहितेच्या आरोपातून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

(२) आरोपींचा जामीन कदबा रद्द करण्यात येत आहे.

(३) आरोपींना निर्देशीत करण्यात येते की, फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ४३७–(अ)(१) नुसार त्यांनी सहा महिन्यांसाठी त्यांचे रु. १५,०००/– चे वैयक्तिक बंधपत्र द्यावे.

(४) प्रस्तुत प्रकरणातील जप्त मुद्देमाल एक कु–हाडीचा दांडा ही मुल्यहिन असल्याने अपील कालावधीनंतर नियमाप्रमाणे नष्ट करावी.

(५) न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात उद्घोषित व निर्गमीत करण्यात आले.

**(अभय म. विभुते),**

दिनांक : ०१/०३/२०२४
ठिकाण : कळंब.

न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,
कळंब, जि.यवतमाळ